'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा >>पान 2

हवामान अभ्यासक पंजाब डक यांची उमरा येथे भेट >>पान 3

गणेश विसर्जनासाठी जात असलेल्या चिमुकल्यांवर काळाचा घाला; तीन चिमुकल्यांचा ट्रॅक्टर खाली येऊन दुर्दैवी अंत >>पान 4

**सुविचार**

प्रत्येक बाबतीत दुसऱ्याच अनुकरण करु नका; स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 42 ■ बुधवार, दि. 18 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


बेताल वक्तव्यानंतर आमदार संजय गायकवाड यांची पुन्हा धमकी चर्चेत राहण्याचा नवा फंडा

आतील पान




## पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नांची जागतिक पातळीवर दखल

### वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमच्या २० देशातील प्रतिनिधींच्या उपस्थितीत होणार सन्मान सोहळा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्र यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केलेल्या कार्यासाठी वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमच्या वतीने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा सन्मान करण्यात येणार आहे. एनसीपीए येथे २० देशातील प्रतिनिधींच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय बांबू दिवसाचे औचित्य साधत उद्या १८ सप्टेंबर रोजी हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



पर्यावरण व शाश्वत विकासासाठी महाराष्ट्र देशात प्रथम आता तापमान वाढीचे युग संपून होरपळीचे युग सुरू झाल्याने त्वरित कृतीची गरज संयुक्त राष्ट्र संघटनेने व्यक्त केली आहे. त्यास प्रतिसाद देणारा भारत हा पहिला देश ठरला आहे तर महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. यासाठी राज्यात मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास कृती समितीची स्थापना केली असून त्याचे अध्यक्ष मुख्यमंत्री श्री. शिंदे आहेत. अंमलबजावणीसाठी कार्यकारी अध्यक्षपदी पाशा पटेल यांना नेमून संबंधित सचिव यांचे कार्यकारी मंडळ देखील तयार करण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी त्यासाठी पहिले पाऊल टाकले. तापमान वाढ कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी हरित महाराष्ट्राची संकल्पना त्यांनी मांडली. त्याशिवाय औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये ५ टक्के बायोमास वापरायचे देखील निर्देश संबंधित विभागांना दिले आहेत. त्यासाठी ११ लाख हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवडीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याचबरोबर अर्थसंकल्पामध्ये उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी १ लाख २० हजार एकर क्षेत्रामध्ये बांबू लागवडीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे ग्रीकल्चर टुडे या संस्थेने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा दिल्लीमध्ये नुकताच सन्मान केला. त्याची दखल आता थेट जागतिक पातळीवर घेण्यात आली व वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमने पुढाकार घेऊन जागतिक स्तरावर मुख्यमंत्र्यांच्या कामाची दखल घेतली आहे.

'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम' अन्नसुरक्षा विषयी जागतिक व्यासपीठ 'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम' हे अन्नसुरक्षा विषयी जागतिक नेत्यांना चर्चा करण्यासाठीचे व्यासपीठ आहे. जागतिक कृषी मंचचे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंज हे आहेत. कृषी क्षेत्रातील प्रगतीच्या अनुषंगाने भविष्यातील धोरण आणि जागतिक स्तरांवर होत असलेल्या कामांची दखल घेऊन जागतिक पुरस्कारासाठी जगातील विविध देशातून नामांकन विचारात घेण्यात येतात. जागतिक परिणामकारक वनस्पती विज्ञान, कृषी विषयक विविध पैलूंबद्दल माहिती घेताना उत्पादन, व्यापार, तंत्रज्ञान, व्यवसाय, धोरण आणि आर्थिक परिस्थिती, पोषण, अन्न प्रक्रिया, पाणी आणि पर्यावरण या व्यापक बाबींचा समावेश करते. यासाठी निवड योग्यता आणि पूर्णतेसाठी नामांकनांचे पुनर्विलोकन करून, ते निवडीसाठी पाठवले जातात. निवड समिती नंतर नामांकनांचे पुनर्विलोकन करते आणि प्राप्तकर्त्यांची शिफारस करते. बुधवारी १८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मुंबईतील या कार्यक्रमाचे आयोजन फिनिक्स फाउंडेशन (लोदगा, जिल्हा लातूर) यांनी केले असून १८ सप्टेंबर या आंतरराष्ट्रीय बांबू दिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम एनसीपीए सभागृहात सकाळी ११ वाजेपासून तर रात्री नऊ वाजेपर्यंत विविध चर्चासत्रांमध्ये पार पडणार आहे. यामध्ये जगभरातील या विषयातले तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. त्याच दिवशी संध्याकाळी सहा ते नऊ या वेळेत मुख्य सत्काराचा कार्यक्रम होईल.

## कायदेशीर कारवाई करणार : सलमान खान

### अमेरिका दौऱ्याबाबत सत्य सांगण्यासाठी जारी केली अधिकृत नोटीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : बॉलिवूडचा दबंग खान म्हणजेच सलमान खानच्या अमेरिका दौऱ्याची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. असे म्हटले जात आहे की यावर्षी सलमान खान अमेरिकेत कॉन्सर्ट करताना दिसणार आहे. मात्र अलीकडेच सलमान खानने त्याच्या टीमच्या माध्यमातून या बातम्यांना अफवा ठरवून फसवणूक असल्याचे म्हटले आहे. सलमान खानने त्याच्या चाहत्यांना सांगितले की ही टूर गोष्ट पूर्णपणे फसवणूक आहे. त्याने सांगितले की, या वर्षी त्याचा अमेरिकेत कार्यक्रम करण्याचा किंवा प्रवास करण्याचा कोणताही विचार नाही. तो म्हणाले की अशा कोणत्याही फसव्या कॉल किंवा ईमेलवर विश्वास ठेवू नका.



वास्तविक, काही दिवसांपूर्वी एक पोस्ट व्हायरल होत होती, ज्यामध्ये असे लिहिले होते की, सलमान खान ५ ऑक्टोबरला अमेरिकेतील अर्लिंग्टन थिएटरमध्ये परफॉर्म करणार आहे. ही बातमी थांबवण्यासाठी सलमान खानने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर अमेरिका दौऱ्यासंदर्भात अधिकृत नोटीस जारी केली आहे. ज्यामध्ये त्याने आपल्या नावाचा वापर करून फसवणूक होत असल्याचे पूर्णपणे स्पष्ट केले आहे. त्याच्या टीमने ही पोस्ट केली आहे. त्याच्या चाहत्यांना फसवणुकीपासून वाचवण्यासाठी ही नोटीस जारी करण्यात आली आहे, जेणेकरून टूर तिकीट घोटाळ्यात कोणीही अडकू नये.

### पुन्हा पुढे ढकलला जाणार अजय देवगणचा सिंघम? कार्तिक आर्यनचा मोकळा होणार मार्ग!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : यावर्षी अजय देवगणचे तीन मोठे चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. एका चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद मिळाला, तो म्हणजे 'शैतान'. याशिवाय 'मैदान' आणि 'औरों में कहां दम था' बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाले. सध्या अजय देवगण त्याच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याचा बहुप्रतिक्षित सिंघम अगेन हा चित्रपट यंदाच्या दिवाळीत प्रदर्शित होणार आहे. रोहित शेट्टीचा चित्रपट पुढे ढकलला जाऊ शकतो, अशा बातम्या सतत येत आहेत. तथापि, निर्मात्यांनी अद्याप काहीही पुष्टी केलेली नाही. खरं तर, कार्तिक आर्यनचा 'भूल भुलैया ३' देखील दिवाळीला रिलीज होणार आहे. निर्माते संघर्ष टाळण्याचा >> पान २

# विसर्जन मिरवणुकीला गालबोट, इंदापूर अन् अकोल्यात मुलं बुडाली

### कोल्हापुरात परवानगी नसतानाही लेझर शो सुरुच

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी** : गणेश विसर्जन मिरवणुकीला इंदापूर आणि अकोल्यात गालबोट लागल्याचं पाहायला मिळालंय. अकोल्यात आणि इंदापुरात गणेश विसर्जनासाठी गेलेले मुलं बुडाली आहेत.

इंदापूर तालुक्यातील श्री क्षेत्र नीरा नरसिंहपूर येथे नीरा नदी पात्रात गणेश विसर्जनासाठी गेलेला मुलगा बुडाल्याची घटना दुपारी घडली. अनिकेत विनायक कुलकर्णी असे बुडालेल्या मुलाचे नाव आहे. मुलाच्या शोधण्यासाठी युद्धपातळीवर प्रशासन प्रयत्न करीत आहे. इंदापूरचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक, घटनास्थळी दाखल झाले आहेत. नीरा नरसिंहपूर येथे वेद अध्यायन शिकविणाऱ्या पाठशाळेत अनिकेत कुलकर्णी हा शिकत होता. गणेश विसर्जनासाठी नदीपात्रात तो इतर मुलांसह गेला असता सदरची दुर्दैवी घटना घडली. पोलीस घटनास्थळी दाखल होत असून, होडीतून व पाण्यात बुड्या घेऊन सदर मुलाच्या सध्या शोध घेतला जात आहे.

अकोल्यात सलग दुसर्या दिवशी गणेश विसर्जनादरम्यान बुडून एकाचा मृत्यू झालाय. जिल्ह्यातील म्हैसांग येथील पूर्णा नदीवर गणेश विसर्जनावेळी गणेश गायकवाड या १८ वर्षीय तरुणाचा नदीत बुडून मृत्यू झालाय. गणेश हा अकोला शहरातील अकोटफैल भागातील रहिवासी आहेय. आज दुपारनंतर गणेश हा आईसोबत घरगुती गणेशाचंवविसर्जन करण्यासाठी म्हैसांग इथे पूर्णा नदीवर गेला होताय. गणेश विसर्जनावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने तो नदीत बुडालाय. तातडीने विसर्जनासाठी आलेल्या नागरिकांनी त्याला नदीबाहेर काढले आणि रुग्णालयात दाखल केलेय. मात्र, डॉक्टरांनी





त्याला मृत घोषित केलंय. काल बाळापूर तालूक्यातील भिकूंडखेड येथे गणेश विसर्जनादरम्यान भिकूंड नदीत बुडून एकाचा मृत्यू झालाय.

कोल्हापुरात लेझर शो वर बंदी असताना मिरवणूक


लेझर शो वर बंदी असताना बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत लेझरचा वापर. लेझर शो मुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा झाली होती. त्यानंतर पोलिसांनी बंदी घातली होती. पण पोलिसांच्या सूचना मंडळांनी पाळल्या नाहीत.

गेल्या कित्येक वर्षापासून वसईत हिंदू-मुस्लीम ऐक्याची परंपरा जपली जात आहे. वसईत ईद ए मिलाद चा कार्यक्रमा निमित्त मुस्लिम बांधवांनी गणेशोत्सव विसर्जनाच्या मार्गावर विसर्जनासाठी निघालेल्या गणेशभक्तांसाठी खाद्य आणि पाणी ची व्यवस्था केली आहे. ईद ए मिलाद च्या या कार्यक्रमात कोणतही मुस्लिम धर्मियांच गाण न लावता चक्क गणपतीची गाणी लावली जात आहेत. गणेशभक्तांची सेवा केली जात आहे.

# १८ वर्षांखालील यूजर्सच्या Instagram अकाउंटवर आता पालकांचे नियंत्रण, मेटाचा नवीन नियम लागू

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : मेटा कंपनीने इन्स्टाग्रामवरील १८ वर्षांखालील मुलांच्या अकाउंटसाठी प्रायव्हसी आणि पॅरेंटल कंट्रोल म्हणजे पालक नियंत्रणाचे नवीन नियम लागू केले आहेत. त्यामुळे यापुढे १८ वर्षांखालील सर्व अकाउंट हे ढशशप –लर्लीपी मध्ये रुपांतरित केले जातील. अशा यूजर्सना केवळ ते फॉलो करत असलेल्या किंवा आधीपासून कनेक्ट केलेल्या खात्यांद्वारे मेसेज आणि टॅग केले जाऊ शकते. याशिवाय सोशल मीडियावरील सेंसेटिव्ह कन्टेन्ट म्हणजे संवेदनशील सामग्री ही रिस्ट्रिक्टिव्ह सेटिंगमध्ये बदलली जाईल. सोशल मीडियाच्या वाढत्या नकारात्मक प्रभावामुळे मेटाने त्यांच्या धोरणात हा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.




Instagram हे असे सोशल प्लॅटफॉर्म आहे ज्याचा वापर जगभरातले कोट्यवधी यूजर्स करतात. फोटो आणि व्हिडीओ त्यावर शेअर केले जातात. जगभरातले सर्व सेलिब्रेटी असो वा राजकारणी, इन्स्टाग्रामच्या माध्यमातून ते जगाशी कनेक्ट असतात. या इन्स्टाग्रामचा वापर लहान मुलेही मोठ्या प्रमाणात करतात. पण सध्या सोशल मीडियावर नकारात्मकता वाढत असल्याचे अनेक अहवालातून स्पष्ट झालं आहे. त्या पार्श्र्वभूमीवर मेटाने त्यांच्या धोरणात बदल केला आहे.

पालकांचे मुलांच्या अकाउंटचे नियंत्रण मिळणार

मेटाच्या नव्या नियमानुसार, १८ वर्षांखालील यूजर्सच्या अकाउंटचा नियंत्रण त्यांच्या पालकांकडे असणार आहे. असे यूजर्स केवळ पालकांच्या परवानगीने डीफॉल्ट सेटिंग्ज बदलू शकतात. पालकांना सेटिंग्जचा एक संच देखील मिळेल जेणेकरून ते त्यांची मुले कोणाशी संवाद साधत आहेत ते पाहू शकतील, तसेच पचा वापर मर्यादित करू शकतील. सोशल मीडियाच्या वापरामुळे मुलांमध्ये आणि युवकांमध्ये डिप्रेशन, एंग्जाइटी आणि लर्निंग डिसेबिलिटी अशा समस्या निर्माण होत असल्याचं तज्ज्ञांनी सांगितलं आहे.

Meta, TikTok आणि YouTube विरुद्ध खटला

Meta, ByteDance's TikTok आणि Google चे YouTube मुळे मुले सोशल मीडिया ॲडिक्ट होत असल्याचा आधीच आरोप करण्यात येत आहे. यामुळे अमेरिकेत या कंपन्यांच्या विरोधात हजारो याचिका दाखल करण्यात आल्या असून त्यांच्यावर खटलाही सुरू आहे. जनतेची दिशाभूल केल्याबद्दल या कंपन्यांवर खटला दाखल करण्यात आला आहे.

# विकसित भारताची यशोगाथा लिहिणाऱ्यांसाठी फेलोशिपची घोषणा, मोदींच्या वाढदिवसाचे औचित्य

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचं औचित्य साधून ब्लूक्राफ्ट डिजिटल फाउंडेशनने आपल्या नव्या पब्लिशिंग अँड नॉलेज सेंटरची घोषणा केली आहे. या केंद्राअंतर्गत फाउंडेशनने विकसित भारत फेलोशिपचीही घोषणा केली असून, एकूण २५ जणांना फेलोशिप दिली जाणार आहे. देशाबद्दल अर्थपूर्ण नॅरेटिव्हसाठी योगदान करणाऱ्या देशातल्या आणि जगभरातल्या उदयोन्मुख तसंच अनुभवी प्रोफेशनल्सचा, तसंच शिक्षणतज्ज्ञ आणि तज्ज्ञांची निवड या फेलोशिपसाठी केली जाणार आहे. त्यासाठी देशाच्या वैविध्यपूर्ण प्रवासाचं विविध प्रकारांमध्ये दस्तऐवजीकरण (डॉक्युमेंटेशन) करणं गरजेचं आहे. नॉन-फिक्शन पुस्तकं, लेख, रिसर्च पेपर्स, सामाजिक मूल्यांना वाहिलेलं लहान मुलांसाठीचं साहित्य, बदलांच्या गोष्टी उलगडणारी कॉफी टेबल बुक्स आणि प्रभावांचा अभ्यास मांडणाऱ्या केस-स्टडीज आदी प्रकारे हे डॉक्युमेंटेशन केलं जाऊ शकतं.



ही फेलोशिप त्रिस्तरीय असेल. ब्लूक्राफ्ट असोसिएट फेलोला मासिक ७५ हजार रुपये स्टायपेंड दिला जाईल. ब्लूक्राफ्ट सीनिअर फेलोला मासिक सव्वा लाख रुपये, तर ब्लूक्राफ्ट डिस्टिंग्विश्ड फेलोला मासिक दोन लाख रुपयांचा स्टायपेंड दिला जाणार आहे. फेलोशिपचा कालावधी एका वर्षाचा असून, त्या कालावधीत हा स्टायपेंड दिला जाईल. या फेलोशिपसाठी निवड झालेल्या फेलोजना मेंटॉरशिप मिळेल. तसंच, विषयतज्ज्ञ, नामवंत प्रोफेशनल्स, विचारवंत आदींशी चर्चा करण्याची संधी मिळेल. त्यातून त्यांचं संशोधन आणि लेखनासाठी उत्तम रिसोर्सेस मिळतील. यातून पूर्ण झालेलं लेखन ब्लूक्राफ्ट डिजिटल फाउंडेशनअंतर्गत प्रसिद्ध केलं जाऊ शकतं. त्यातून फेलोजना अधिकाधिक व्यक्तींपर्यंत पोहोचण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होईल आणि भारताच्या विकासात योगदान करता येईल. इच्छुक उमेदवार एक नोव्हेंबर २०२४पर्यंत यासाठी अर्ज करू शकतात. यासाठीचे सविस्तर तपशील, मार्गदर्शक सूचना आणि अर्ज www.bluekraft.in/fellowship या वेबसाइटवर उपलब्ध असतील.

ब्लूक्राफ्ट डिजिटल फाउंडेशनचे सीईओ अखिलेश मिश्रा यांनी सांगितलं, की 'विकसित भारत फेलोशिपचं टायमिंग प्रतीकात्मक आहे. विकास, सर्वसमावेशकता आणि पंतप्रधानांना सर्वांच्या योगदानातून, सहभागातून जी प्रगती अपेक्षित आहे त्यासाठी आमची कटिबद्धता यातून प्रतिबिंबित होते. त्यासाठी आजच्यापेक्षा अधिक चांगलं औचित्य आणखी कोणतं असणार?'

ब्लूक्राफ्ट डिजिटल फाउंडेशनने पब्लिशिंग अँड नॉलेज सेंटरची घोषणा केली आहे. अर्थपूर्ण विवेचन आणि उच्च दर्जाच्या पब्लिकेशन्सच्या निर्मितीसाठी हे सेंटर काम करील. आधुनिक आणि उत्क्रांत होत असलेल्या भारताची मूल्यं आणि आकांक्षा, तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकसित भारताचा दृष्टिकोन यांच्यावर आधारित प्रकाशनांचा यात समावेश असेल. विकासाचे यशस्वी प्रयत्न, परिवर्तनकारी सामाजिक बदलांचं विश्र्लेषण, तसंच आर्थिक विकास, सामाजिक जागरूकता, अर्थपूर्ण सहभाग या बाबी समजून घेणं याचाही त्यात समावेश असेल. संशोधन आणि वास्तवातले अनुभव यांच्या >> पान २

# परभणीत मिरवणुकीतील डीजेमुळे एकाचा हृदयविकाऱ्याच्या झटक्याने मृत्यू, दोघांची प्रकृती गंभीर

**परभणी/प्रतिनिधी** : राज्यात गणेश विसर्जन उत्साहात सुरू असताना परभणीत मात्र डीजेमुळे एकाचा हृदय विकाराच्या झटक्याने एकाचा मृत्यू झालाय. तर दोघांची प्रकृती अतिशय गंभीर आहे. दोघांना प्रकृती गंभीर झाल्याने जिंतुरहून परभणीला हलवण्यात आले आहे. परभणीच्या जिंतुर शहरात गणेश विसर्जन मिरवणूक सुरु होती. यावेळी हा प्रकार घडलाय.



अधिकची माहिती अशी की, श्री राजा शिवछत्रपती गणेश मंडळाची मिरवणूक शिवाजी चौकात आली होती. त्यावेळी जोरदार सुरू असलेल्या डीजेमुळे संदीप कदम यांच्या मृत्यू झाला. >> पान २

## पुरातन विधीचा आणि संस्कृतीचा विसर

भारतीय पुरातन शास्त्र आणि संस्कृतीनुसार श्राद्ध पक्षाला विशेष महत्त्व आहे. तिथीनुसार यावर्षी बुधवार, १८ सप्टेंबर भाद्रपद कृष्ण पक्षाच्या प्रतिपदेपासून महालय श्राद्धास सुरुवात आहे. यास 'पितृपक्ष' असेही संबोधले जाते. भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षाच्या प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत प्रतिदिन महालय श्राद्ध करावे, असे शास्त्रवचन आहे. परंतु, हे शक्य नसल्यास ज्या तिथीला घरामधील ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला असेल त्या दिवशीही महालय श्राद्ध करण्याचा परिपाठ आहे. भारतीय संस्कृतीमध्ये कृतज्ञता मानणे यास खूप महत्त्व आहे. हीच आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. पाच संकल्पनेतून देव, पितृ, ऋषी, गुरू या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य ठरते. त्यामुळे रोज देवपूजा, ऋषिपूजन पितृतर्पण व पंच महायज्ञाचे प्रयोजन आपल्या पुरातन भारतामध्ये केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून रोज पितृयज्ञ व कावळ्यास घास द्यावा, असे सांगितले आहे. एवढे करूनही आपण पितृऋणामधून मुक्त होत नसल्याने शास्त्रामध्ये श्राद्धविधीची योजना केली आहे. 'श्रद्धाया क्रियते यत् तत् श्राद्धय अशी श्राद्ध या शब्दाची व्याख्या केली गेली आहे. आपल्या पुरातन संस्कृतीमध्ये वर्षभर अनेक श्राद्धकर्मे सांगितली आहेत. वर्षभर ही श्राद्धकर्मे जरी शक्य नसली तरी एका वर्षामध्ये वर्षश्राद्ध आणि महालय श्राद्ध सहज करता येतात. वर्षश्राद्ध आई-वडील वा इतर कोणी मृत असतील तर ते त्यांच्यापुरते मर्यादित असते. परंतु, महालय श्राद्ध सर्व पितरांना उद्देशून असल्याने हे श्राद्ध केलेच पाहिजे, असाही एक नियम आहे. आपल्या संस्कृतीमध्ये पितरांना मंगल कार्यामध्येही फार मोठे स्थान दिले गेले आहे. सर्व मंगल कार्य व अनुष्ठानामध्येही श्राद्ध केले जाते. त्यास 'नांदी श्राद्ध' असे म्हणतात. महालय श्राद्धाचा मुख्य काळ भाद्रपद कृष्ण प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत असतो. यास 'पितरांचा अपरान्ह काळ' असेही म्हटले जाते. आपले एक वर्ष म्हणजे पितरांचा एक दिवस गणला जातो, असा समज आहे. पितृऋण फेडण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे श्राद्धविधी. ज्या आई-वडिलांनी आपल्या सुख आणि सौभाग्यासाठी अपार कष्ट घेऊन मोठे केले, स्वतः उपाशी राहून घास भरविला अशा आई-वडिलांची आठवण आम्हास हा पितृपक्ष करून देत असतो. त्यांच्या या ऋणामधून आपल्याला या अल्प प्रयत्नाने जरी मुक्त होता येत असेल तर काय वाईट. अन्यथा जन्माला येऊनही संपूर्ण आयुष्य व्यर्थ नव्हे का? या पितृ पंधरवड्यामध्ये आपले पूर्वज सूक्ष्म रूपात पृथ्वीवर येऊन भोजनाची अपेक्षा ठेवत असतात, असा समज आहे. त्यामुळे या पंधरवड्यात पितृतर्पण आणि श्राद्धविधी अवश्य करावे. असे केल्याने पितृव्रताची पूर्तता होते. श्राद्धकर्म तिथीनुसारच का करावे, याचेही विवेचन शास्त्रामध्ये आहे. केले जाणारे प्रत्येक कार्य त्या तिथीला आणि मुहूर्ताता करणे फार महत्त्वाचे आहे. कारण या दिवशी त्या त्या घटनात्मक कर्माचे कालचक्र आणि प्रत्यक्ष घटनाक्रम, त्यामधून उत्पन्न होणारा परिणाम या सर्वांची स्पंदने एकसारखी व एकमेकांना पूरक असणे होय. प्रत्येक घटना अथवा बाब ही त्याच्या भावासहित जन्माला येते. प्रत्येक गोष्टीची परिणामकारकता ही त्याचा कर्ता योग्य घटिका व कार्यस्थळावर अवलंबून असते. त्यामुळे कार्याची फलनिष्पत्ती होऊन कार्य करणाऱ्यास इच्छित फलप्राप्ती होते. श्राद्धकर्माची आवश्यकता आणि उपयोगिता गरुड पुराणामध्ये सांगितली आहे. परंतु, या आधुनिक युगामध्ये आम्हास सर्वच पुरातन विधीचा आणि संस्कृतीचा विसर पडला आहे. पाश्चिमात्यांच्या भौतिक सुखाच्या संस्कृतीने आमच्या परंपरागत सण आणि उत्सवामध्येही खंड पडला आहे. ही रूढ होत असलेली घातक परंपरा समाजाला अधोगतीकडे घेऊन जाणारी असतानाही आम्ही मूकदर्शक बनून त्याकडे बघतो आहोत. जगामध्ये अन्य देश या उज्ज्वल परंपरेकडे आशेने बघत असतानाही आम्ही मात्र त्याकडे हीन भावनेने बघतो, हे भारतीयांसाठी दुर्दैवच नव्हे का? भारतीय परंपरेतील प्रत्येक सण आणि उत्सव विज्ञानाशी सांगड घालून त्याची योजना केली गेली आहे, त्यामुळे ही परंपरेची उपयोगिता आजही आणि भविष्यामध्येही तेवढीच राहणार आहे...

## 'या' ५ सवयींमुळे कमी होतात पुरुषांचा स्पर्म काऊंट, हे आहे त्यावर रामबाण उपाय

प्रेम, लग्न आणि नंतर मुलं बाळ हा साधारण समाजातील एक भाग आहे. लग्न झालं की आई वडील होणं हे आपल्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. बाळ होण्यासाठी स्त्री आणि पुरुष या दोघांचे आरोग्य योग्य हवं. शरीरसंबंध ठेवणं म्हणजेच सेक्स करणं हे मानवी जीवनाचा एक भाग आहे. याच लैंगिक संबंधांतून मुलं जन्माला येतात. आई होण्यासाठी महिलाचं परिपक्व गर्भ, फर्टिलिटीचं प्रमाण, नियमित मासिक पाळी या गोष्टी महत्त्वाच्या असतात. तसंच पुरुषांसाठी शुक्राणूंची संख्या महत्त्वाची असते. एका अभ्यासात धक्कादायक खुलासा समोर आला आहे. ज्यात आजच्या पुरुषांची प्रजनन क्षमता झपाट्याने कमी होत असल्याचे समोर आलंय. ज्याचं कारण शुक्राणूंची संख्या कमी असणे आहे. या मागे तुम्हाला असणारी वाईट सवयी. जर तुम्हालाही या सवयी असतील तर वेळीच सावध व्हा.

धुम्रपान – जे पुरुष मोठ्या प्रमाणात धुम्रपान करतात त्यांना स्पर्म काऊंट कमी होण्याची समस्या उद्भवू शकते.

तणाव – ऑफिसचा वाढलेला तणावामुळे तुमच्या शुक्राणूंची संख्या कमी करु शकतात. सतत तणावात राहणं, कमी झोपणं, सतत टेन्शनमध्ये राहणं यामुळे तुमचा स्पर्म काऊंट कमी होतो.

व्यायामाचा अभाव –तासंतास खुर्चीवर बसून काम, त्यात व्यायामाचा अभाव...यामुळे पुरुषांमध्ये लठ्ठपणाची समस्या जाणवते. तज्ज्ञांच्या मते लठ्ठपणामुळे शुक्राणूंची संख्या कमी होते. जर पुरुषांना त्यांचं सेक्स लाइफ चांगलं हवं असेल तर दररोज व्यायाम करणं गरजेचं आहे.

रात्री उशिरा झोपणं – रात्री उशिरा झोपल्यामुळे तणाव आणि लठ्ठपणाची समस्या वाढते. ज्यामुळे शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते. इतकंच नाही, तर रात्री उशिरापर्यंत जागरण केल्याने तुमची रोगप्रतिकारशक्तीही कमकुवत होते.

पॅन्टच्या खिशात मोबाईल ठेवणे – पुरुषांनी आपला मोबाईल पँटच्या खिशात ठेवल्याने शुक्राणूंची संख्या कमी होते, असं एका अभ्यासात समोर आलं आहे. कारण मोबाईल फोनमधून निघणाऱ्या रेंजचा शुक्राणूंवर वाईट परिणाम होतो.

शुक्राणूंची संख्या वेगाने वाढेल व्हिटॅमिन डीयुक्त पदार्थांचं सेवन

शुक्राणूंची संख्या वाढविण्यासाठी व्हिटॅमिन डीयुक्त पदार्थांचे सेवन करा. हे एक उत्तेजक आहे जे टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढवण्याचं काम करते.

अश्वगंधा – पुरुषांसाठी अश्वगंधा खूप फायदा होतो. हे एक सर्वोत्तम नैसर्गिक औषध आहे. दररोज पाच ग्रॅम अश्वगंधा सेवन केल्याने शुक्राणूंची संख्या वाढण्यास मदत होते.

शिलाजीत – हे दुसरं एक औषध आहे, ज्यामुळे नपुंसकत्व टाळण्यासाठी उत्तम सप्लिमेंट आहे. जर तुमच्या शुक्राणूंची संख्या कमी होत असेल, तर शिलाजीतचे दिवसा सेवन करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

झिंक – झिंक पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या वाढविण्यास खूप फायदेशीर आहे. म्हणूनच स्त्रियांपेक्षा पुरुषांना त्याची जास्त गरज असते. झिंक हे पुरुषांच्या लैंगिक, प्रोस्टेट आणि टेस्टोस्टेरॉनच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

# जोडीदार सतत चिंतेत असल्याने बिघडलेय वैवाहिक आयुष्य? 'या' टिप्स करतील मदत

प्रत्येकाचे वैवाहिक जीवन हे अनेक चढ-उतारांनी भरलेले असते. जोडीदार आजारी पडला की त्याला आपण डॉक्टरकडे घेऊन जातो. त्याची विशेष काळजी घेतो त्याला बरा करतो. पण कधी कधी पार्टनर चिंतेच्या समस्येने ग्रासलेला असतो. सतत कोणत्या ना कोणत्या गोष्टीची चिंता पार्टनरला सतावत असते. याचा परिणाम नात्यावर होत असतो. चिंता हा नैराश्याचा एक भाग आहे. जेव्हा चिंता असते तेव्हा जोडीदार नेहमी रागावतो आणि त्याचा स्वभावही चिडचिड होतो. अनेकदा चिंताग्रस्त असलेली व्यक्ती लोकांशी संवाद कमी करते. ही चिंता दीर्घकाळापर्यंत सुरु राहिली तर वैवाहिक जीवनात अनेक प्रकारचे अडथळे येऊ लागतात.

अशा परिस्थितीत जोडीदाराला साथ देण्यासोबतच त्याला समजून घेण्याचाही प्रयत्न करायला हवा. असे केल्याने तुम्ही त्याची चिंता कमी करण्यास मदत करु शकाल. पार्टनरला या टप्प्यातून बाहेर पडण्यास मदत कराल. पार्टनरची चिंता कमी करण्यासाठी काही टिप्स जाणून घेऊया.

चिंतेबद्दल स्वत: जाणून घ्या

तुमच्या जोडीदाराला चिंतेतून बाहेर काढण्यासाठी पार्टनरला कशाची काळजी वाटते? याचा शोध घ्या. असे केल्यास तुम्हाला तुमच्या जोडीदाराला भेडसावणाऱ्या समस्येचा अंदाज येईल. अशाने तुम्ही त्याचीतिची चांगली काळजी घेण्यास सक्षम असाल.

अशा विषयांबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करा ज्यामध्ये तुमच्या जोडीदाराला अधिक चिंता वाटते. जोडीदाराला चिंतेतून बाहेर काढताना संयम बाळगा. तुमचा पार्टनर काय म्हणतो ते लक्षपूर्वक ऐका. ज्या विषयाने पार्टनरला जास्त त्रास होईल, असे विषय टाळा.



संवाद साधा

जर तुमचा पार्टनर चिंताग्रस्त असेल तर त्याच्याशी बोला. आपण त्याच्यासोबत आहोत याची त्याला जाणीव करून द्या. त्याच्याशी बोलत असताना, त्याला कोणत्या गोष्टीची चिंता सतावतेय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. तुम्ही त्याच्यासाठी खास आहात हे तुमच्या जोडीदाराला समजू द्या. यासाठी पार्टनरला, भेटवस्तू द्या, खास प्लानिंग करा. तुम्ही आरामात बोलू शकाल अशा ठिकाणी पार्टनरला घेऊन जा.

तज्ञांची मदत घ्या

खूप काही करूनही तुमच्या पार्टनरमध्ये काही बदल होत नाही असे तुम्हाला वाटत असेल, तर तुमच्या पार्टनरला तज्ज्ञ किंवा थेरपिस्टची मदत घेण्याचे महत्व पटवून द्या. काऊन्सिलरचे सेशल अटेंड करा. असे केल्याने तुम्ही तुमच्या जोडीदाराची समस्या अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकाल आणि त्यालातिला चिंतेतून बाहेर पडण्यास मदत कराल. काऊन्सिलर तुम्हाला चिंतेतून कसे बाहेर पडायचे ते सांगतील आणि तुम्हाला चिंता असेल तेव्हा काय करावे याबद्दल तज्ञांकडून सल्ला घ्या.

पान १ वरून...

## पुन्हा पुढे ढकलला जाणार अजय

प्रयत्न करत आहेत. आता 'सिंघम अगेन' २ आठवड्यांसाठी पुढे ढकलला जाऊ शकतो अशी माहिती मिळाली आहे. निर्मात्यांनी असा निर्णय घेतल्यास हा चित्रपट १५ नोव्हेंबरला प्रदर्शित होईल.

रोहित शेट्टीचा हा चित्रपट दिवाळीला प्रदर्शित होणार आहे. याची घोषणा काही वेळापूर्वी एक पोस्टर जारी करून करण्यात आली होती. मात्र रिलीज डेट जाहीर करण्यात आली नव्हती. चाहत्यांना दिवाळीची मजा घेता येणार आहे. एकाच वेळी दोन चित्रपट प्रदर्शित होण्याच्या तयारीत आहेत. अजय देवगणचा चित्रपट यापूर्वीच एकदा पुढे ढकलण्यात आला आहे. प्रत्यक्षात तो १५ ऑगस्टला आणण्याचे नियोजन होते. मात्र निर्मात्यांनी काम पूर्ण झाले नसल्याचे सांगत तारीख वाढवली. त्याच वेळी अल्लू अर्जुनचा पुष्पा २ देखील रिलीज होणार होता. मात्र नंतर तोही पुढे ढकलण्यात आला. निर्माते आता काय नियोजन करत आहेत? चला समजून घेऊया.

अलीकडेच बॉलीवूड हंगामावर एक रिपोर्ट प्रसिद्ध झाला होता. यावरून रोहित शेट्टी सध्या त्याच्या टीमशी चित्रपटासंदर्भात बोलत असल्याचे समोर आले आहे. दिवाळीला दोन चित्रपटांमध्ये होणारा संघर्ष पुढे ढकलला जावा, अशी त्याची इच्छा आहे. ट्रेड चर्चेनुसार, ज्यांच्याशी रोहित शेट्टीने चर्चा केली आहे, त्यात अजय देवगण, जिओ स्टुडिओ, रिलायन्स एंटरटेनमेंट आणि कुमार मंगत यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत अनेकवेळा बैठका झाल्या आहेत. वर्षाच्या सुरुवातीपासूनच हॉरर कॉमेडी चित्रपटांना खूप पसंती दिली जात आहे. या चित्रपटांना खूप प्रेम मिळाले आहे. यामध्ये 'मुंज्या' आणि 'स्त्री २'चा समावेश आहे. अशा परिस्थितीत, भूल भुलैया ३ ला चांगली कामगिरी करण्यास भरपूर वाव आहे, जो अजय देवगणच्या चित्रपटाला मागे टाकू शकतो.

सिंघम अगेनचे निर्माते आता सोलो रिलीजच्या शोधात आहेत. हा चित्रपट १ नोव्हेंबर ऐवजी १५ तारखेला रिलीज होऊ शकतो असे बोलले जात आहे. अंतिम निर्णय काय घेतला जाईल, केवळ निर्मातेच यावेळी निश्र्चित करू शकतात. मात्र तो एकटा रिलीज करण्याची योजना आखली जात आहे. अजय देवगणचा हा चित्रपट मोठ्या बजेटमध्ये बनवण्यात आला आहे. अशा परिस्थितीत निर्मात्यांना कोणताही धोका पत्करायचा नाही. प्रत्येक तोटा आणि नफा ते आधीच मोजत आहेत. चित्रपटाबाबत २४ तासांत कधीही मोठा निर्णय घेतला जाऊ शकतो.

कार्तिक आर्यनचा 'भूल भुलैया ३' दिवाळीला रिलीज होणार आहे. चित्रपटासाठी आवश्यक वातावरण तयार करण्यात आले आहे. स्त्री २ नंतर, प्रत्येकजण पुढील हॉरर कॉमेडी चित्रपटाची वाट पाहत आहे. याच कारणामुळे रोहित शेट्टीला सोलो रिलीजचा विचार करावा लागला आहे. 'भूल भुलैया २' लाही चांगला प्रतिसाद मिळाला होता.

## विकसित भारताची यशोगाथा

विश्र्लेषणातून धोरणकर्त्यांना, प्रॅक्टिशनर्सना आणि नागरिकांना माहिती देणं, प्रेरित करणं आणि विविध क्षेत्रांमध्ये प्रगतिशील बदल घडवून आणणं हा केंद्राचा उद्देश आहे.

ब्लूक्राफ्ट डिजिटल फाउंडेशनचे संचालक हितेश जैन यांनी सांगितलं, की 'भारतातल्या सध्याच्या सामाजिक विकासाबद्दल सुरू असलेल्या चर्चेत वैचारिक प्रकाशनं आणि ज्ञानाच्या देवाणघेवाणीतून आम्ही योगदान करू शकतो. देशभरात सुरू असलेल्या परिवर्तनकारी कामांच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करणं आणि उज्ज्वल भविष्यासाठी कम्युनिटीला शक्ती देणं, तसंच व्यावहारिक सोल्युशन्स देतील अशा चर्चा घडवणं हे आमचे उद्देश आहेत.'


## परभणीत मिरवणुकीतील

तर शिवाजी कदम आणि शुभम कदम हे २ जणांची प्रकृती गंभीर आहे. या दोघांवरही जिंतुर ग्रामीण रुग्णालयात प्रथमोपचार करून त्यांना परभणीकडे पुढील उपचारासाठी रवाना करण्यात आले आहे. सध्या जिंतुर ग्रामीण रुग्णालयात मोठ्या प्रमाणात तरुण जमले आहेत. पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस या घटनेनंतर सुरु असलेल्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

राज्यभरात गणेश विसर्जनाचा उत्साह शिगेला पोचला असून परभणीतही पारंपरिक वाद्यांच्या गजरात मुख्य सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुकांना सुरुवात झाली होती. काही मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत सजीव देखावे सादर केले आहेत, तर राजे संभाजी मित्र मंडळाने आदिवासी नृत्याचा देखावा केलाय. दुसरीकडे मानाचा मोठा मारुती संस्थानच्या ही विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झालीय. त्या पाठोपाठ इतर मंडळांच्या मिरवणुका सुरु आहेत. बालाजी गणेश मंडळाने राजस्थानच्या खातून बाबांचा देखावा परभणीकरांसमोर आणलाय तर सिंधी गणेश मंडळांने ही बैलगाडीत गणरायाची मिरवणूक काढलीय. या सर्व मिरवणुका छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन शहरातील मुख्य बाजारपेठेतून जात शिवाजी चौकात या मिरवणुकांचा समारोप होत आहे.

## Resume तयार करताना 'या' दोन चुका करु नका; नाहीतर हातातून नोकरी गेलीच म्हणून समजा!

तुम्ही जर नोकरीसाठी अर्ज करण्याचा विचार करत असाल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमचा रेझ्युमे एचआर विभागाकडे पाठवावा लागतो. हल्ली तरुणाई विचार न करता रिझ्युमे तयार करून नोकरीसाठी अर्ज करताना दिसतात. एकदा रेझ्युमे तयार केला की तो पुन्हा वाचणे त्याला आवश्यक वाटत नाही, ज्याचा थेट परिणाम त्याच्या नोकरीवर होतो.



आज आम्ही तुम्हाला रेझ्युमेमधील त्या दोन चुकांबद्दल सांगणार आहोत, ज्या अनेकदा नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या तरुणांकडून केल्या जातात. हे पाहून उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी कोणतीही तयारी केलेली नाही, हे मुलाखतकाराला समजते. जाणून या दोन चुका कोणत्या? पाहुयात... महत्वाचीच माहिती लिहा!

कुठल्याही कंपनीला कामासाठी चांगल्या कर्मचाऱ्याची गरज असते. त्यामुळे रेझ्युमेमध्ये त्या गोष्टी लिहा, ज्या आवश्यक आहेत. अनेकदा उमेदवार रिझ्युमेमध्ये अधिक माहिती टाकतात. अनेकद आपण अनावश्यक माहिती त्यात टाकतो. त्यामुळे रेझ्युमे प्रभावी दिसत नाही. आपल्याला ज्या पदासाठी रेझ्युमे पाठवायचा आहे. त्या पदासाठी आवश्यक असणारी माहिती रेझ्युमेमध्ये आवर्जून द्यावी. शिवाय काही खठ ज्दगृ देखील हायलाईट करायला विसरु नका. त्यासोबतच तुमचा रेझ्युमे २ पानांपेक्षा जास्त नसावा.

जास्त स्टायलिश रिझ्युमे तयार करु नका!

सध्या रेझ्युमे तयार करण्यासाठी अनेक बेवसाईट्स उपलब्ध आहेत. त्यातील विविध प्रकारचे टेम्प्लेट्स वापरुन अनेकजण रेझ्युमे तयार करतात. सगळं रेडिमेट मिळत असल्याने त्यातलीच एखादी चांगली डिझाईन वापरुन अनेकजण रेझ्युमे तयार करतात. यात वेगळं आणि चांगलं रेझ्युमे तयार करण्याच्या नादात आपण स्टायलिश रेझ्युमे तयार करतात. मात्र तुमच्या स्किल्समध्ये कंपनीला इंट्रेस्ट असतो. तुम्ही डिझाईन केलेल्या रेझ्युमेमध्ये कंपनीला इंट्रेस्ट नसतो. त्यामुळे रेझ्युमे तयार करताना वाचायला सोपा असा फॉन्ट निवडण्याचा सल्ला दिला जातो. जेवढा साधा, सोपा , सरळी रिझ्युमे तयार कराल तेवढं चांगलं राहिलं.

विविध ॲप्स आणि वेबसाईट्स उपलब्ध

कॅनव्हा सारख्या अनेक वेबसाईट्स उपलब्ध आहेत. ज्यात आपण अगदी प्रोफेशनल रेझ्युमे तयार करु शकतो किंवा रेझ्युमे तयार करण्यासाठी वेगवेगळे अष्ठ टूल्सदेखील उपलब्ध असतात. यातदेखील तुम्ही चांगले रेझ्युमे तयार करु शकता. फक्त रेझ्युमे तयार करताना साधा आणि नीटनेटका असायला हवा एवढं नक्की.

# टाकाऊ वस्तूंपासून तरुणाने बनवले स्प्रे मशीन; २० मिनिटात १ एकर शेतीची होते फवारणी

आज-काल अनेक तरुण हे नोकरी करण्यापेक्षा व्यवसाय करण्याकडे भर देत आहेत. त्यातही अनेक लोक शेतीकडे प्रामुख्याने लक्ष देत आहेत. शेतीमध्ये ते वेगवेगळे प्रयोग करत आहेत. आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे ते चांगल्या पद्धतीने शेती करत आहेत. यामध्ये यश देखील येत आहे. अशातच नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील तरुणाने भांगरतून घरी ५५ फूट बूम प्रेस मशीन बनवली आहे. आणि याद्वारे त्यांनी वीस मिनिटात दहा एकर जमिनीची फवारणी केलेली आहे. त्यामुळे या युवकाचे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे. त्याचे नाव कमलेश अशोक चौधरी असे आहे. त्याचे वय ३४ वर्ष एवढे आहे. आता आपण या तरुणाची यशस्वी वाटचाल जाणून घेणार आहोत.



कमलेश चौधरी हा सुरुवातीला एका खाजगी कंपनीत नोकरी करत होता. परंतु त्याचे वडील आजारी पडले आणि त्यांनी नोकरी सोडून गावाकडे यायचा निर्णय घेतला. वडिलांच्या आजारपणामुळे त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी त्याच्या वडिलांची शेती केली. त्याच्या वडिलांची एकूण १० एकर शेती होती. तो ती शेती करू लागला. त्याचे कृषी पदवीधर पर्यंत शिक्षण झालेली आहे. त्याने गावाबाहेर एका गोडाऊनमध्ये सर्व टाकाऊ वस्तु ठेवून त्याचा संग्रह करून ठेवलेला आहे. तो हे टाकाऊ पदार्थ वापरून दरवर्षी शेतीसाठी नवनवीन अवजार तयार करत असतो. आणि त्याचे व्हिडिओ तो युट्युबवर देखील दाखवत असतो. टाकाऊ पदार्थापासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याची त्याला अगदी लहानपणापासूनच आवड होती. या टाकाऊ पदार्थांचा वापर करून त्यांनी आत्तापर्यंत एक हजार आठशे पन्नास एकर वर औषध फवारणी केलेली आहे. त्याने यावर्षी हायड्रोलिक तोही ५० फूट ला तयार केलेला आहे. त्याने ५० फूट लांब इतके हायड्रोलिक बुम स्प्रे मशीन तयार केलेली आहे. यातून तो वीस ते पंचवीस मिनिटात दहा एकर शेत करा कीटकनाशके तणनाशकाची फवारणी करू शकतो.

कसे तयार केले मशीन?

हे मशीन तयार करण्यासाठी कमलेश एक जुना ट्रॅक्टर खरेदी केला. त्यांनी हा ट्रॅक्टर साडेतीन लाख रुपयांना खरेदी केला. त्यासाठी त्यांनी पंजाबीतून १ लाख ७५००० चे इजराइल बनावटीचे बुस्टनचे एअरलेस टायर मागवले. त्यानंतर त्यांनी मागील दोन टायर सहा फूट उंचीचे तर पुढील दोन टायर साडेचार फूट उंचीचे ठेवले. त्यानंतर त्यांनी त्याला तब्बल १००० लिटरची टाकी बसवली टाकी बसवण्यासाठी त्यांना ४५ हजार रुपये एवढा खर्च आला. ही टाकी त्याने ट्रॅक्टरचा अगदी मधोमध बसवलेली आहे. त्यानंतर त्यांनी त्या टाकीत औषधे टाकून ती फवारणी करण्यासाठी एक स्पीड बसवला. जो एका मिनिटाला १८५ लिटर पाण्याचा प्रेशर करतो. तसेच कीटकनाशकाची फवारणी आपल्या अंगावर येऊ नये. म्हणून त्यांनी काचेची केबिन बनवली आहे. त्यात एक पंखा देखील बसवला आहे. हे सगळे काम त्यांनी केवळ दोन महिन्यात पूर्ण केले.

कमलेशने केवळ २० ते २५ मिनिटात दहा एकर फवारणी केलेली आहे. त्याने ५० फूट बूम स्प्रे तयार केला आहे. यामुळे खूप पटकन त्याचे काम होते. या मशीनमुळे आता मजूर वर्गाचे कष्ट कमी झालेले आहे. तसेच फवारणी करताना समप्रमाणात फवारणी केली जाते. कमी वेळात आणि पैशाची बचत होत फवारणी केली जाते. सध्या कमलेशने बनवलेली ही मशीन सर्वत्र प्रसिद्ध होत आहे. आणि अनेक लोक त्याचे कौतुक देखील करत आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

## सर्व शासकीय यंत्रणांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी – डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान व शहरातील विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा दि.१९ सप्टेंबर रोजी शारदा ज्ञानपीठ हायस्कूल येथे होत आहे. या मेळाव्यासाठी ३० ते ४० हजार महिला लाभार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन केले जात आहे. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रत्येक शासकीय यंत्रणेला दिलेल्या जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान



पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा महिला बालविकास अधिकारी अमोल डिघोळे, जिल्हा पुरवठा अधिकारी आर.एम. बसैय्ये यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक शासकीय विभागांना जबाबदारीचे वाटप करण्यात आलेले आहे. दिलेल्या जबाबदारी प्रमाणे संबंधित विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी–कर्मचारी यांच्याकडून चोखपणे काम करून घ्यावे. कोणत्याही विभागाला आपल्या कामाविषयी शंका असेल तर त्याचे निरसन तात्काळ करून घ्यावे. कार्यक्रम स्थळावर तीस ते चाळीस हजार लाभार्थी येण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या बसण्याची व्यवस्था, मोबाईल टॉयलेट, स्वच्छता, भोजन, पाणी आदी व्यवस्था चांगल्याप्रकारे करा. पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित ठेवून वाहतूक व्यवस्थेचे नियोजन काटेकोरपणे करावे. तसेच कार्यक्रम स्थळावर येणाऱ्या महिला लाभार्थ्यांसाठी जेवण व पाण्याची व्यवस्था करावी. सर्व संबंधित विभागाने परस्परात योग्य समन्वय ठेवून मेळावा व्यवस्थितपणे पार पडेल यासाठी प्रयत्न करावे, अशा सूचना यावेळी दिल्या.

प्रत्येक तालुक्यातून लाभार्थी आणले जाणार आहेत, त्यासाठी लाभार्थ्यांच्या संख्या प्रमाणे प्रत्येक तालुक्याला बसेसचा पुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी लाभार्थी व्यवस्थितपणे कार्यक्रमाच्या ठिकाणी येतील व त्यानंतर ते व्यवस्थितपणे त्यांच्या घरी पोहोचतील याचे योग्य नियोजन करावे. लाभार्थ्यांना घेऊन येणाऱ्या बसेसची पार्कींग व्यवस्था डी. एड. महाविद्यालय मैदान व जिजामाता महाविद्यालय मैदान येथे तर खाजगी वाहनासाठी जिजामाता महाविद्यालय मैदान व आयटीआय कॉलेजच्या बाजुकडील प्रांगणात करण्यात आली आहे. तसेच शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे वाहन पार्कींग व्यवस्था होमगार्ड मैदान येथे करण्यात आली आहे. कार्यक्रम स्थळावर आवश्यक त्या सर्व सोईसुविधा संबंधित विभागाने पुरवाव्या. कार्यक्रम सोहळाकरीता येणाऱ्या महिला भगिनींना कोणतही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना डॉ. पाटील यांनी यावेळी दिल्या.

## संक्षिप्त...

### कल्याणमध्ये धक्कादायक प्रकार डॉक्टरकडून अंध दांपत्याच्या नवजात बाळाला विकण्याचा प्रयत्न





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : डॉक्टराला देव मानले जाते, मात्र कल्याणमध्ये एका डॉक्टरांचे दानवाचे रूप समोर आले आहे. डॉक्टरने एका अंध दांपत्याचे जन्मलेले बाळ दुसऱ्याला विकण्यासाठी आपल्या ताब्यात ठेवले. एवढेच नाही तर बाळाच्या आईचे दूध बंद होण्यासाठी अंध आईला गोळ्या देखील दिल्या. अखेर ही घटना समोर आल्यानंतर कल्याणच्या खडकपाडा पोलिसांनी डॉक्टरच्या विरोधात गुन्हा दाखल करीत पुढील तपास सुरू केला आहे. अनुदुर्ग धोनी असे या डॉक्टरचे नाव असून मोहने परिसरात डॉक्टर धोनी याचे गणपती नर्सिंग होम नामांकित हॉस्पिटल आहे.

### सेस फंड योजनेसाठी अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातर्फे सेस फंड योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मागासवर्गीय शेतकरी व महिला लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह संबंधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयाकडे दि.९ ऑक्टोंबर२०२४ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन अति.मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेच्या २० टक्के सेस फंड योजनेंतर्गत सन २०२४–२५ या वर्षासाठी मागासवर्गीय शेतकऱ्यांना, मागासवर्गीय आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीस १०० टक्के अनुदानावर ५ एचपी विद्युत मोटार पंप, एचडीपीई पाईप, मागासवर्गीय महिलांकरीता शिलाई मशिन पुरविण्याची योजना घेण्यात आली आहे. सदर योजनेचे अर्ज पंचायत समितीस्तरावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मागासवर्गीय शेतकरी व महिला लाभार्थ्यांनी परीपूर्ण अर्ज अनुषंगिक सर्व कागदपत्रासह संबंधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालयाकडे सादर करावेत.



# ना ना मुंदडा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अकोल्यातही भरारी

## विज्ञान प्रदर्शनात विदर्भात प्रथम क्रमांक

दैनिक आपला विदर्भ

■ प्रकाश भुरे

**मालेगाव** : रोटरी क्लब आणि किट्स यांनी आर्टिफिशियल इंटलीजन्स वर आधारित विज्ञान प्रदर्शन अभियंता दिनाच्या निमित्ताने आयोजित केले होते त्यामध्ये विदर्भातील अनेक नामांकित शाळांनी सहभाग घेतला होता त्यामधे ना ना मुंदडा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांने प्रथम क्रमांक पटकवला आहे.

आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व कळावे आणि स्वतः विज्ञानाचे प्रयोग करून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक बनण्यासाठी पुढाकार घ्यावा यासाठी





लहानपणापासून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उच्च स्तरावरील विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते.

त्यामध्ये विदर्भातील अनेक नामांकित शाळांनी याच रजिस्ट्रेशन करून सहभाग घेतला होता रविवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन एल आर टी कॉलेज अकोला येथे केले होते. त्यामध्ये मुंदडा विद्यालयाच्या तृप्ती नॅनोटे महेश शर्मा पार्थ उमाटे निशांत पारेकर शंतनू गवळी यश शिंदे सुशांत राजूरकर राम काटेकर रामेश्वर लहाने या ९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता यापैकी महेश शर्मा या विद्यार्थ्याचा पूर्ण प्रदर्शनांतून प्रथम क्रमांक आला आहे त्याने प्रदूषण नियंत्रण वर आधारित प्रोजेक्ट सादर केला त्यामध्ये वाहनांपासून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण रोखले जाते. वाहनांपासून बाहेर पडणाऱ्या कार्बन डायॉक्साईड आणि कार्बन मोनोक्साइड सारख्या घातक पदार्थांच त्या यंत्राद्वारे शोषण करून त्याचे रूपांतर चांगल्या घटकामध्ये केले जाते. हा प्रोजेक्ट सादर केला. त्याला अजय भिसडे आणि गोविंद लहाने आणि विज्ञान शिक्षकांनी मार्गदर्शन केले त्याला प्रमाणपत्र आणि तीन हजार रुपये रोख बक्षीस देण्यात आले. बक्षीस वितरणाला कॉलेज चे अध्यक्ष मोतिसिंग मोहता आणि शिक्षणाधिकारी सौ सुचिता पाटेकर आणि विविध मान्यवर उपस्थित होते

# संशोधन व सामंजस्य करार ही काळाची गरज : शास्त्रज्ञ डॉ.संजय कामटेकर

**नांदेड/प्रतिनिधी** : श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इंटरशिप अँड एमओयू कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'ऑपॉर्च्युनिटीज ऑफ एम.ओ.यु. अँड लींकेजेस विथ इंडस्ट्री' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

चर्चासत्राचे अध्यक्षस्थान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र–कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य तथा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री.नरेंद्र चव्हाण, प्रमुख वक्ते एमआयटी, पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ.संजय कामटेकर व शास्त्रज्ञ डॉ.भारत काळे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते डॉ.संजय कामटेकर यांनी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवीन संशोधन कार्य त्याचबरोबर संशोधन कार्याचे वेगवेगळ्या संस्थांशी संलग्निकरण करण्याबाबतचे महत्त्व विशद केले. डॉ.संजय कामटेकर हे मागील ३७ वर्षे अमेरिकेत शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. त्यांनी अमेरिकेत जे संशोधनकार्य केलेले आहे; त्याबद्दल सुद्धा त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री.नरेंद्र चव्हाण यांनी, शेतीतील कामासाठी संशोधन त्याचबरोबर शेती व्यवसाय व शेतीवर अवलंबित उद्योग निर्मितीसाठी तंत्रज्ञान या विषयावर विचार व्यक्त केले.

एमआयटी, पुणे येथील शास्त्रज्ञ डॉ. भारत काळे यांनी आपल्या उत्साहपूर्ण मार्गदर्शनामध्ये, मी कसा घडलो, व कुठल्याही कमतरतेचा उहापोह न करता; आहे त्या परिस्थितीमध्ये, आहे त्या ठिकाणी, सतत कार्य व संशोधन केल्यामुळे मी कसा या पदापर्यंत पोहोचलो, याचे अतिशय सविस्तर मार्गदर्शन केले. ऊर्जा, कृषी, कृत्रिम बुद्धिमत्ता, भौतिक विज्ञान अशा विविध विषयांतील बदलांचा मानवी जीवनावर होणारा सकारात्मक व नकारात्मक परिणाम याबद्दल देखील आपले मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांनी, महाविद्यालयात असणाऱ्या संशोधन सुविधा तसेच एनईपी संदर्भात आपले विचार व्यक्त केले. त्याचबरोबर महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या विद्यार्थ्यांकेंद्रित उपक्रमाविषयी मार्गदर्शन केले.

प्रश्नोत्तर सत्रात प्राध्यापकांनी आपल्या शंका तज्ञ मार्गदर्शकांना विचारल्या. त्यामध्ये प्रामुख्याने फार्मसी महाविद्यालय, यशवंत महाविद्यालय, इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको, शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर आणि राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील प्राध्यापकांनी प्रश्न विचारले. सूत्रसंचालन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे सह–समन्वयक डॉ.माधव दुधाटे यांनी केले तर आभार इंटरनशिप व एमओयु कमिटी प्रमुख डॉ. विजय भोसले यांनी मानले.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे आणि डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ. साहेबराव शिंदे, डॉ. विजय भोसले, डॉ.संदीप खानसोळे, डॉ. श्रीकांत जाधव, डॉ.अजय मुठे आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष सदस्यांनी परिश्रम केले तसेच प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील व डॉ.अजय गव्हाणे यांनी सहकार्य केले.

# बुधवारी औसा येथील तक्षशिला बौद्धविहार विकासकामांचा टप्पा १ चा लोकार्पण आणि टप्पा २ चा भूमिपूजन सोहळा

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची प्रमुख उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**औसा/प्रतिनिधी** : औसा शहरातील तक्षशिला बौद्धविहार विकासकामांचा टप्पा १ चा लोकार्पण आणि टप्पा २ चा भूमिपूजन सोहळा (दि.१८) सप्टेंबर रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी केंद्रीय व राज्य मंत्रिमंडळातील नेते सहभागी होणार असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन तक्षशिला बौद्धविहार लोकार्पण सोहळा संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले,तसेच प्रमुख उपस्थिती क्रीडा युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे, इतर मागास बहुजन कल्याण गृहनिर्माणमंत्री अतुल सावे, माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, तर



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार अभिमन्यू पवार व आशिर्वादपर डॉ भंते उपगुप्त महाथेरो (पुर्णा विहार), भंते सुमेध नागसेन (खरोसा), भंते महाविरो थेरो (काळेगाव), भंते पय्यानंद थेरो (लातूर), भंते नागसेन बोधी थेरो (उदगीर), भंते धम्मासार (किल्लारी) भंते सुमंगल (उमरगा), भंते राहूल (काळेगाव), भंते बुध्दशील (लातूर), भंते सोनुत्तर (काळेगाव) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

प्रसिद्ध गायिका कडूबाई खरात यांचा भीमगातांचा कार्यक्रम बुधवारी सकाळी १०:३० वाजता औसा येथील विजय मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. भीमानं माय सोन्यानं भरली ओटी, तुम्ही खाता त्या भाकरीवर, कुंकू लाविलं रमानं, आमचा मास्तर शिकवतो ही त्यांनी गायिलेली काही लोकप्रिय भीमगीते आहेत.

उत्कर्ष बहुजनांचा संकल्प कल्याणाचा या संकल्पनेतून विमुक्त जाती,भटक्या जमाती व इतर मागास प्रवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनेचा जागर सोहळा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते बुधवार (दि १८) सप्टेंबर रोजी दुपारी ३ वा. किल्लारी सहकारी साखर कारखान्याच्या ठिकाणी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन तसेच मंत्री अतुल सावे, मंत्री संजय बनसोडे व मान्यवरांच्या उपस्थितीत राहाणार आहेत.

### मध्यरात्री घरी आला नवरा, बायकोनं दारच उघडलं नाही; छतावरुन आत घुसला आणि दिसलं धक्कादायक!

नवी दिल्ली : बहराइचमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. तिथला एक ट्रक ड्रायव्हर कामावर गेला होता. तो मध्यरात्री घरी परतला आणि त्याने घराचा दरवाजा ठोठावण्यास सुरुवात केली; पण कोणीही दार उघडलं नाही, त्यामुळे तो घराच्या छतावर चढला. छत तोडून त्याने घरात डोकावून पाहिलं असता, त्याला जबर धक्का बसला. आत त्याची पत्नी तिच्या प्रियकरासोबत आक्षेपार्ह स्थितीत होती. हा सर्व प्रकार पाहून तो संतापला. त्याने पत्नीच्या प्रियकराशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादावेळी धारदार शस्त्रानं वार करून त्याने प्रियकराची हत्या केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

उत्तर प्रदेशातल्या बहराइचमध्ये रविवारी रात्री एका व्यक्तीने त्याच्या पत्नीच्या प्रियकराची धारदार शस्त्रानं हत्या केली. ही घटना कैसरगंज पोलीस स्टेशन हद्दीत घडली आहे.

# हवामान अभ्यासक पंजाब डक यांची उमरा येथे भेट

## शेकडो शेतकऱ्यांना पावसाबद्दल दिले मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर** : पातुर तालुक्याच्या उमरा येथील फौजी राजेंद्र रामदास चिपळे यांनी ३२ वर्ष देशाच्या सुरक्षेतेसाठी सीमेवर सेवा दिली अनु आपल्या जन्मभूमी उमरा येथे परतले त्यानिमित्ताने गावकऱ्यांनी सेवानिवृत्त फौजी राजेंद्र चिपळे यांचा स्वागत करून कार्यक्रमाचे आयोजन केले,आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना





हवामान बद्दल माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने जेष्ठ समासेवक विलास हरमकार यांनी पंजाबराव डक यांच्याशी संपर्क करून त्यांना शेतकऱ्यांना मार्गदर्शन साठी उमरा येथे कार्यक्रमासाठी येण्याची विनंती केली, पंजाब डक यांनी सोमारी कार्यक्रमाला भेट देऊन शेकडो शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले,२१ सप्टेंबर नंतर मुसळधार पावसाचा अंदाज शेतकऱ्यांना सांगितला,आणि सेवानिवृत्त झालेले फौजी राजेंद्र रामदास चिपळे यांचा सत्कार केला,यावेळी उमरा व परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### बिग बॉस मधून बाहेर पडल्यानंतर रॅपर आर्या जाधवचे अमरावतीत जोरदार स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** बिग बॉस मराठीचे पाचवे पर्व सध्या चांगलेच गाजत आहे. या शोमध्ये मूळची अमरावतीची असणारी रॅपर आर्या जाधव ही बिग बॉस मधून बाहेर आल्यानंतर पिहल्यांदाच अमरावतीत आली आहे. यावेळी आर्याचे अमरावतीकरांनी रॅली काढत जोरदार स्वागत केले. आर्यासोबत सेल्फी काढण्यासाठी तिच्या चाहत्यांनी मोठी गर्दी केल्याचे पहायला मिळाले. अमरावतीकरांनी मला दिलेलं प्रेम पाहून माझे मन भरुन आलेय त्यामुळे अमरावतीकरांचे आभार मानते अशी प्रतिक्रिया यावेळी आर्या जाधव हिने दिली आहे.

### श्रीराम मठ येथे महाप्रसादाचे वितरण; हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथील प्रसिद्ध श्रीराम मठ येथे आयोजित श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. या श्रीमद् भगवत कथेची भव्य महाप्रसादाने नुकतीच सांगता करण्यात आली.या महाप्रसादाचा परिसरातील हजारो भाविकांनी लाभ घेतला. जिल्हा परिषद माजी कृषी सभापती राजेंद्र पळसकर यांच्या हस्ते पूजन करण्यात आल्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आला. यावेळी श्रीराम मठाच्या सदस्य मंडळीकडून राजेंद्र पळसकर यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार देखील करण्यात आला. यावेळी सुभाष पाटील पळसकर, रवी पांडव,अमोल धोटे व श्रीराम मठाचे सर्व सदस्य व गावकरी मंडळी व माता-भगिनी या ठिकाणी उपस्थित होत्या आयोजित महाप्रसादाचा परिसरातील हजारो भाविकांनी लाभ घेतला.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.

### प्रबोधनकार ठाकरे यांना जयंतीनिमित्त अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केशव सीताराम ठाकरे ऊर्फ प्रबोधकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ, उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा नाझर गजानन मोतेकर यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही यावेळी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

### मलकापूर, नांदुरा, धाड, चिखलीकडून येणाऱ्या वाहतुक मार्गात बदल; पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान व शहरातील विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा दि.१९ सप्टेंबर रोजी शारदा ज्ञानपीठ हायस्कूल येथे होत आहे. त्याअनुषंगाने गुरुवार दि. १९ सप्टेंबर रोजी बुलढाणा शहराकडे मलकापूर, नांदुरा, धाड व चिखली कडून येणारी सर्व वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

बुलढाणा शहराकडे येणारी जड वाहतुकीमुळे अपघात किंवा कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने मलकापूर, नांदुरा, धाड व चिखली कडून येणारी सर्व वाहतुक खालीलप्रमाणे पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. मलकापुर व मोताळा कडून येणारी वाहतुक नांदुरा-खामगाव-चिखलीमार्गे जालना या पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. तसेच नांदुरा कडून येणारी वाहतुक खामगांव-चिखलीमार्गे-जालना या पर्यायी मार्गाने, चिखली कडुन येणारी वाहतुक चिखली-खामगांव-नांदुरा मलकापूर या पर्यायी मार्गाने तर धाड व अजिंठा कडुन येणारी व मलकापूरकडे जाणारी वाहतुक धाडनाका-सरक्युलर रोड-त्रिशरण चौक ते चिखली किंवा खामगांव या पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.

# बेताल वक्तव्यानंतर आमदार संजय गायकवाड यांची पुन्हा धमकी चर्चेत राहण्याचा नवा फंडा

## समस्यांवरुन लक्ष विचलीत करण्याचा प्रकार


दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलडाणा. वारवार बेताल वक्तव्य करून चर्चेत राहणाऱ्या शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांनी आता 'आरक्षण रद्द करण्याबाबतचे विधान करणाऱ्या राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्याला ११ लाख रूपयांचे बक्षीस देऊ,' असं आक्षेपार्ह विधान केल्याने नवा वाद निर्माण झाला. या आक्षेपार्ह विधानामुळे राजकीय वादंग निर्माण झाला आहे.तर, आ. गायकवाड यांच्याविरोधात बुलढाणा येथे पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असताना गायकवाड यांनी माफी मागण्याऐवजी काँग्रेसला धमकी दिली आहे. तर काँग्रेसने गायकवाड यांच्या विधानावर काँग्रेसने जोरदार टीका केली. तसेच चर्चेत राहण्याचा हा नवा फंडा असल्याचा आरोप करून निवडणुकीच्या तोंडावर समस्यांवरून लक्ष विचलीत करण्याचा प्रकार आहे.सुधारतील ते आमदार गायकवाड कसले. अशी टिका काँग्रेसने केली आहे.



अमेरिका दौऱ्यावर असताना राहुल गांधी यांनी देशात अनुकूल सामाजिक परिस्थिती निर्माण झाल्यास आरक्षण रद्द करण्याचा विचार करू, असं विधान केले होते. या विधानावरून भाजप, बहुजन समाज पक्ष, शिवसेना आणि भाजपच्या इतर काही मित्रपक्षांनी राहुल गांधी आणि काँग्रेसवर सडकून टीका केली. तर आ. गायकवाड यांनी सोमवारी राहुल गांधी यांच्यावर आक्षेपार्ह भाषेत टीकास्त्र डागले. महाराष्ट्रात आणि देशात आरक्षणाच्या मागणीची आग लागलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात मागासवर्गीय, आदिवासी आणि अन्य प्रवर्गातील लोकांना आरक्षण दिले. मात्र, राहुल गांधींनी विदेशात जाऊन, 'माझ्या देशातील आरक्षण संपवायचे आहे,' असं विधान केले. काँग्रेसचा खरा चेहरा समोर आला असून राहुल गांधींनी त्यांच्या पोटातील मळमळ बाहेर ओकली आहे. लोकसभा निवडणुकीत संविधान धोक्यात आहे, असा फेक नरेटिव्ह सेट करून काँग्रेसने मते घेतली. आज ते आरक्षण संपविण्याची भाषा करू लागले आहेत. १०० टक्के काँग्रेसला मागासवर्गीय, ओबीसी आणि आदिवासींचे आरक्षण संपवायचे आहे. राहुल गांधींची जीभ छाटणाऱ्याला ११ लाखांचं बक्षीस देईल, असे विधान संजय गायकवाड यांनी केले होते. तर राहुल गांधींबाबत केलेल्या वक्तव्यानंतर काँग्रेस आणि महाविकास आघाडीकडून संजय गायकवाड यांना लक्ष्य करण्यात येत आहे. संजय गायकवाड आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माफी मागावी, अशी मागणी होत आहे. मात्र, गायकवाड यांनी माफी मागण्यास साफ नकार दिला असून वरून दमदाटीची भाषा करीत वक्तव्यावर ठाम असल्याचे सांगितले आहे.तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा १९ सप्टेंबर रोजी बुलढाण्यात कार्यक्रम आहे. दुसरा कार्यक्रम 'लाडकी बहीणी'ची आहे. गोरगरीब शेतकरी महिलांचा आहे. माझ्या कार्यक्रमात काँग्रेसच्या कोणी कुत्र्यांनी घुसण्याचा प्रयत्न केला, तर तिथेच गाडू टाकू. आमच्या रोडवर पाय ठेवून दाखववं. तुम्हाला समजेल शिवसेना काय आहे? असा इशारा संजय गायकवाड यांनी दिला आहे.



### स्ट्रक्चरल ऑडिट शिवाय मुख्यमंत्र्यांनी महापुरुषांच्या पुतळ्याचे लोकार्पण करु नये- धिरज लिंगाडे

बुलढाणा शहरात २६ महापुरुषांचे पुतळे बसविण्यात आले आहेत आणि त्यांचे १९ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ज्या पुतळ्यांना परवानगी मिळालेली नाही त्यांचे देखील अनावरण करणार आहेत का ? असा प्रश्न उपस्थित करत महापुरुषांच्या पुतळ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले नसेल तर मुख्यमंत्र्यांनी उद्घाटन करु नये अशी प्रतिक्रिया आमदार धिरज लिंगाडे यांनी पत्रकार परिषद दिली. तसेच या कार्यक्रमाच्या छापण्यात आलेल्या पत्रिकेमध्ये सर्व जातीचे महापुरुष असा उल्लेख करण्यात आला आहे यावर आक्षेप घेत महापुरुषांना जात कधीपासून आली ? असा सवाल आमदार धिरज लिंगाडे यांनी उपस्थित केला आहे. या महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यापासून प्रशासकीय अधिकाऱ्यांना फार दबावाखाली काम करावे लागत आहे त्यात बुलढाण्यात काही वेगळी परिस्थिती नाही. कालच्या संजय गायकवाड यांच्या वक्तव्यामुळे ते संपूर्ण देशात प्रसिद्ध झाले आहेत. तसेच पत्रिकेमध्ये सर्व जातीच्या महापुरुषांचा असा उल्लेख करुन महापुरुषांना जातीमध्ये विभागले जात आहे अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सचिव जयश्री शेळके यांनी दिली आहे.

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा लातूर जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले हे बुधवार, १८ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. केंद्रीय राज्यमंत्री ना. आठवले यांचे १८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.४५ वाजता औसा शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल. दुपारी १.१५ वाजता औसा नगरपरिषद येथे तक्षशिला बुद्ध विहार उद्घाटन कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. दुपारी १.४५ वाजता औसा येथील विजय मंगल कार्यालयात विविध विकास कामांच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी २.१५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे समाज कल्याण विभागाची आढावा बैठक घेतील. किल्लारी येथे दुपारी ३.३० वाजता केंद्रीय राज्यमंत्री ना. आठवले यांच्या उपस्थितीत विमुक्त जाती, भटक्या जमाती कामगारांचा मेळावा होईल. त्यानंतर किल्लारी साखर कारखाना येथे राखीव.

### शहीद जवान युद्ध स्मारकाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन; माजी सैनिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मुट्ठे ले-आऊट येथील शहीद जवान युध्द स्मारकाचा लोकार्पण सोहळा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, युध्द विधवा, वीरपत्नी, वीरमाता यांनी लोकार्पण सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

### पातुरकर विद्यालयात गणेश विसर्जन मिरवणूक




दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित डोणगाव येथील मदन वामन पातुरकर विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात विद्यालयाचे प्राचार्य रमेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश उत्सवा निमित्त गणेश चतुर्थीला गणरायाची भक्तिमय वातावरणात स्थापना करण्यात आली होती. दिनांक १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थीला विद्यालयाच्या भव्य मिरवणूक काढून श्रींना निरोप देण्यात आला. पालक संचालक गोपाल बोरा यांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली. यावेळी माजी प्राचार्य राजेंद्र उमाळे, प्राचार्य रमेश जाधव, बबन गोरे, संजय कानकटाव यावेळी उपस्थित होते. विद्यालयाच्या गणेश विसर्जन मिरवणूक डोणगाव नगरीतून प्रभात फेरी मार्गाने काढण्यात आली. या मिरवणुकी दरम्यान विविध सामाजिक धार्मिक. प्रबोधन पर विद्यार्थ्यांनी देखावे सादर करून जनजागृती केली. यामध्ये मोबाईलचे दुष्परिणाम,कावड यात्रा, झाडे लावा झाडे जगवा, दिंडी सोहळा,लेझीम पथक, मिल्ट्री कमांडोसह अमरनाथ यात्रा देखावा, मतदान जनजागृती, पालखी सोहळा, लेक वाचवा, लेक शिकवा, शक्तीपीठ, जोगवा गोंधळ, विषयावर आकर्षक अशी देखावे सादर केली. गणेश मिरवणुकी दरम्यान प्रभात फेरी मार्गाने चौका चौकात रांगोळी काढून गणरायाचे पूजन केले. गणेश विसर्जन मिरणुकी दरम्यान डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात होता. प्रभात फेरी मार्गाने गणेश विसर्जन मिरवणूक जात असताना . नयनरम्य सादर केलेले देखावे पाहून चिखली अर्बन बँक.शाखा डोणगाव. डोणगाव अर्बन सोसायटी. महेश अर्बन सोसायटी च्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी ते करिता विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद शिक्षक इतर कर्मचारी यांनी आता परिश्रम घेतले.

## गणेश विसर्जनासाठी जात असलेल्या चिमुकल्यांवर काळाचा घाला; तीन चिमुकल्यांचा ट्रॅक्टर खाली येऊन दुर्दैवी अंत

दैनिक आपला विदर्भ



**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरामध्ये असलेल्या चितोड गावांमध्ये गणेश विसर्जनाची मिरवणूक निघण्यापूर्वी ट्रॅक्टर खाली येऊन तीन चिमुकल्यांचा जागीच दुर्दैवी अंत झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तसेच या घटनेमध्ये २ मुल आणि एका मुलीचा समावेश असून एक महिला देखील गंभीरित्या जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तसेच इतर पाच ते सहा जणांचा देखील दुखापत या भीषण अपघातामध्ये झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घडलेल्या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

झालेल्या भीषण दुर्घटनेमध्ये महेश चिमुकल्यांना सरकारकडून भरपाई मिळवून देण्यासाठी मदत करणार असून तसेच जखमी रुग्णांवर तातडीने योग्य ते उपचार करण्याच्या सूचना वैद्यकीय प्रशासनाला आपण दिले असल्याची माहिती यावेळी आमदार कुणाल पाटील यांनी दिली.

# ऑटो व मोटरसायकलमध्ये जबर धडकेत दोन गंभीर

## किनगाव जट्टू जवळ घडला अपघात

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :** उमरखेड डिंडाळा ता.यवतमाळ येथील जाधव कुटुंब मुंबई वरुन ऑटो क्रमांक MH.04.LX.2570 ने उमरखेड डिंडाळा जिल्हा यवतमाळ कडे जात होते त्या दरम्यान लोणार तालुक्यातील किनगाव जट्टू गावाजवळ तीन वाजे दरम्या ऑटो आणि मोटरसायकल मध्ये भीषण अपघात झाला त्या मध्ये मोटरसायकल क्रमांक



MH.28.-X.0377 वरील प्रदिप मुळे वय ३५ वर्ष रा. खंडाळा ता.लोणार व ऑटो मधील संजय राठोड वय वर्ष २५ हे दोघे गंभीर जखमी झाले या ऑटो मध्ये एकूण ६ लोक प्रवास करत होती त्या मध्ये दोन लहान मुले नैतिक जाधव



वय वर्ष ४ आणि वैष्णवी जाधव वय वर्ष ५ यांचा समावेश आहे त्या दोन लहान मुलांना सुदैवाने जास्त मार लागला नाही मात्र ऑटो मधील बालाजी जाधव वय वर्ष २७ पुष्पा बालाजी जाधव वय वर्ष २० ओम जाधव वय वर्ष १९ संजय राठोड वय वर्ष २५ हे होते अपघात झाला त्यावेळी किनगाव जट्टू येथील स्थानिक नागरिकांनी व बिबी पोलीस स्टेशन चे ठाणेदार संदिप पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत मदत केली व सर्व अपघातात जखमी झालेल्यांना खाजगी वाहनाने ग्रामीण रुग्णालय बीबी येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी म्बुलन्स द्वारे जालना येथे हलवले पुढील तपास बिबी पोलीस करत आहे